# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक २३.०९.२०२६ बुधवार**

**मा. न्यायालयातुन आरोपीला सश्रम कारावासाची शिक्षा :—**

दिनांक २३.०९.२०२६ रोजी, मा. तदर्थ जिल्हा न्यायाधीश—१३, तथा विशेष न्यायाधिश पोक्सो कोर्ट, नागपुर, श्री. एन. आर. तळेकर साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे विशेष केस क्र. २०४/२०२३ मधील, पोलीस ठाणे एमआयडीसी येथील अप. क्र. १४७/२०२३ कलम ३५४(अ), ५०६ भा.दं.वि., सहकलम ८ पोक्सो या गुन्ह्यातील आरोपी विजय चिंतामणराव घोडे, वय ४६ वर्षे, रा. प्लॉट नं. २७, एकात्मता नगर, ठाकरे ले—आऊट, जयताळा, नागपूर याचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ३५४(अ) व ५०६ भा.दं.वि. कायद्यान्वये ०१ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०१ महीना अतिरीक्त कारावासाची शिक्षा तसेच, कलम ८ पोक्सो कायद्यान्वये १८ महीने सश्रम कारावासाची शिक्षा व ५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०१ महीना अतिरीक्त कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक २५.०२.२०२३ चे ०८.०० वा चे सुमारास, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत राहणाऱ्या ३८ वर्षीय फिर्यादी यांची १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही राहते घरी पाण्याचे टॅकर आल्याने, पाणी भरत असतांना, यातील आरोपी याने तिचेशी असभ्य वर्तन करून, तीचे मनास लज्जा येईल असे कृत्य करून तीचा विनयभंग केला व तीला धमकी दिली. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीला दिनांक २६.०२.२०२३ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्हयाचे तपासी अधिकारी तत्कालीन पोउपनि. रामलोड यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती शहाजहान शेख मॅडम यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री. स्वप्नील मोहुर्ले यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा. नितीन शिरसाठ व गुरूदास यांनी काम पाहिले

**(कामगिरी)**

**१) गुन्हेशाखा पोलीसांची दारूबंदी, जुगार, अंमली पदार्थ/प्रतिबंधीत तंबाखु तसेच भारतीय शस्त्र कायदा अंतर्गत धडक मोहीम :—**

मा. पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. सह पोलीस आयुक्त, नागपुर शहर, मा. अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे), मा. पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनात, गुन्हेशाखा पोलीसांनी नागपुर शहर अंतर्गत सर्व पोलीस ठाणे हद्दीत कायदा व सुव्यवस्थेचे दृष्टीने तसेच, गुन्हेगारांवर वचक बसावा याकरीता दिनांक २२.०९.२०२६ ते दि. २३.०९.२०२६ चे दरम्यान, ०२ दिवसीय विशेष मोहीमेअंतर्गत अवैध दारू/अंमली पदार्थ/शस्त्रे बाळगणारे वा विक्री करणारे ईसमांवर कारवाई तसेच, चोरी घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणुन, मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त करून, आरोपींवर कायदेशीर कारवाई केली व त्यांचेविरोधात गुन्हे दाखल केले आहेत.

गुन्हेशाखा पोलीसांनी विशेष मोहीमेदरम्यान नागपुर शहर पोलीस आयुक्तालय अंतर्गत सर्व पोलीस ठाणे हद्दीत १) महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये कारवाई एकुण १५ केसेसमध्ये ७१,२२०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. २) एन.डी.पी.एस. कायद्यान्वये अंमली पदार्थ संबंधीत ०१ केसमध्ये कारवाई करण्यात आली. ३) महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ३,३६,१६०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. ४) शासन प्रतीबंधीत गुटखा व तंबाखु कायद्यान्वये ०३ कारवाई करण्यात आल्या. ५) भारतीय शस्त्र अधिनियम अंतर्गत ०१ केसमध्ये ०१ इसमांवर कारवाई करून आरोपींचे ताब्यातुन शस्त्र जप्त केले आहे. ६) पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील वाहनचोरीचे गुन्ह्यातील आरोपींना अटक करून, ०६ वाहने जप्त करून, एकुण २,९०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ७) पो. ठाणे अजनी हद्दीतील चोरीचा उघडकीस आणुन गुन्ह्यातील आरोपींना अटक केली व चोरी व वाहनचोरीचे एकुण ०४ गुन्हे उघडकीस आणुन एकुण ६,४०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त केला. तसेच, ८) पो. ठाणे हुडकेश्वर हद्दीतील ओयो चिन्हाचा अनधिकृत वापर करणाऱ्या तिन हॉटेल चालकावर कारवाई करण्यात आली. अशाप्रकारे गुन्हेशाखा पोलीसांनी एकुण ३० कारवाई करून, त्यामध्ये एकुण २५ आरोपींना अटक केली व त्यांचेकडुन एकुण १३,३७,८८०/—रू. चा मुद्देमाल जप्त केलेला आहे.

नागपुर शहरातील अवैध धंद्यावर प्रभावी नियंत्रण ठेवण्याकरीता गुन्हेशाखेकडुन सातत्याने कठोर व प्रभावी कारवाई करण्यात येत आहे. यापुढेही सतत कारवाई करून, विशेष मोहीम सुरू राहणार आहेत.

**२) एस्कॉर्ट पथकाची कामगीरी :— अवैधरित्या विदेशी व देशीदारू बाळगणाऱ्या आरोपींविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २२.०९.२०२६ रोजी रात्री एस्कॉर्ट पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत, भांडेप्लॉट, सेवादल नगर येथे एक ईसम अवैधरित्या बेकायदेशिर विक्रीकरीता देशी—विदेशी दारूसाठा बाळगुन आहे. अशा माहीतीवरून सक्करदरा पोलीसांसह पंचासमक्ष नमुद ठिकाणी रेड कार्यवाही केली असता, तेथे राहणारा इसम नामे संदीप सुर्यभान उरकुडे, वय ४२ वर्षे याचे राहते घराची झडती घेतली असता, त्याचे ताब्यातुन वेगवेगळ्या कंपनीची विदेशी दारू एकुण किंमती १५,२७०/—रू. तसेच, देशीदारू किंमती ८,०००/—रू. चा मुददेमाल व रोख दारूविक्रीचे रोख १,८००/—रू . असा एकुण २५,०७०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पोलीस ठाणे सक्करदरा येथे आरोपींविरूध्द कलम ६५(ई) म.दा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपींना मुद्येमालासह पुढील कार्यवाहीस्तव सक्करदरा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी एस्कॉर्ट पथकाचे प्रमुख सपोनि. भगवान कोळी, पोउपनि. चेतनसिंग राजपुत, पोहवा. अनुप लोलुसरे, अर्शद शेख, उमेश बावरे, विष्णु खटके, साहील भोयर व मोहम्मद मेहताब यांनी केली.



**<u>३) गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग पोलीसांची कामगिरी :— ओयो चिन्हाचा अनधिकृतपणे वापर करणाऱ्या तिन हॉटेल व लॉज मालक आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादी श्री. नरेंद्र सुरेश खारवे, वय ४२ वर्षे, रा. मानिकबाग, सिंहगड रोड, पुणे हे ओयो हॉटेल्स ॲण्ड होम्स प्रा. लिमी. या कंपनीमध्ये नोडल अधिकारी म्हणुन कार्यरत आहेत. ओयो ब्राण्ड व लोगो बनावट बनवुन त्याचा दुरूपयोग करणाऱ्या विरूध्द कायदेशिर कारवाई करण्यासाठी कंपनीने त्यांना अधिकृत केलेले आहे. त्यांनी दिलेल्या सुचनेवरून, गुन्हेशाखा सामाजीक सुरक्षा विभाग पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील १) ओयो हॉटेल 'आनंद इन', विहीरगांव, उमरेड रोड २) ओयो हॉटेल 'स्पॉट ऑन फक्त तु आणि मी', माता नगर, बहादुरा, नागपुर ३) ओयो हॉटेल 'एस के हरी' टेलीफोन नगर, उमरेड रोड, नागपुर येथे पंचासमक्ष रेड कारवाई केली असता, तेथे हॉटेल मालक आरोपी अनुक्रमे १) खुशाल विठ्ठलराव वाडेकर, रा. प्लॉट क्र. ३, आऊटर रिंग रोड, विहीरगांव, उमरेड रोड, नागपुर २) चेतन मोतीराम चरडे, रा. प्लॉट नं. २१, माता नगर, बहादुरा, उमरेड रोड, नागपुर ३) प्रज्वल हरीचंद्र कांबळे, रा. टेलीफोन नगर, दिघोरी, नागपुर हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता ओयो ब्राण्ड व लोगोचे नावाखाली हॉटेल चालवित असतांना समक्ष मिळुन आले. तिन्ही आस्थापना मालक आरोपींचे हे कृत्य कलम ३४५(३), ३४७(१), २२३ भा.न्या.सं. सहकलम १०३, १०४ व्यापार चिन्ह् अधिनीयम १९९९ अन्वये होत असल्याने, फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे तिन्ही आरोपींविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील व त्यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

## (गुन्हे)

**<u>१) पोलीस ठाणे पाचपावली :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता कोंडुन ठेवणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २३.०९.२०२६ चे ०७.३० वा. ते ०९.१० वा. चे दरम्यान, पाचपावली पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, टेका नई बस्ती, मक्का मस्जीद जवळील केजीएन ईलेक्ट्रीक दुकान समोर गोवंशीय जनावरांना बांधून ठेवलेले आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, नमुद ठिकाणी जावुन पंचासमक्ष पाहणी केली असता, तेथे लहान मोठे एकुण ०७ गोवंशीय जनावरांना अत्यंत क्रुरपने व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून चारापाणी न देता कत्तलीकरीता बांधून ठेवलेले मिळुन आले. नमुद जनावरांचा मालकाबाबत चौकशी केली असता, आरोपी नामे इब्राहीम वल्द ईस्तेखार अहमद अन्सारी, वय २४ वर्षे, रा. प्लॉट नं. ४२६, कुंदनलाल गुप्ता नगर, यशोधरानगर, नागपुर याने गोवंशीय जनावरांना अवैधरित्या कत्तलीकरीता बांधुन ठेवल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळाहुन एकुण ०७ गोवंशीय जनावरे एकुण किंमती अंदाजे १,२५,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गोवंशीय जनावरे यांना गौरक्षण केंद्र, नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे.

फिर्यादी पोअं. मच्छींद्र लिचडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे पोउपनि. राजेंद्र जाधव यांनी आरोपीविरूध्द कलम ५(अ), ५(ब), ९, ९(अ) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ११(इ)(फ) प्राणी क्रुरता अधिनियम—१९६० अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे मानकापुर :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक २३.०९.२०२६ चे ०४.०० वा. चे सुमारास, मानकापुर पोलीसांचे बिटमार्शल हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना पोलीस नियंत्रण कक्ष येथुन मिळालेल्या माहीतीवरून, ते एस.बि.आय. एटीएम समोर, फरस चौक, मानकापुर येथे गेले असता, तेथील दोन ईसम पोलीसांना पाहुन पळुन गेले. दोन ईसमांना पोलीसांनी ताब्यात घेतले. पोलीसांना पाहुन त्यांनी त्यांचे हातातील लोखंडी पाना व चाकु बाजुला फेकुन दिलेला होता. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) अंकीत परवेश रागासे, वय २२ वर्षे, रा. जरीपटका, पोलीस ठाण्याजवळ, नागपुर २) हर्ष सदासनंद बोंबर्डे, वय २४ वर्षे, रा. भिमसेना झोपडपट्टी, नागपुर असे सांगीतले. त्यांचे जवळील ॲक्सीस दुचाकी ची पाहणी केली असता, त्यामध्ये एक लोखंडी मोठा चाकु मिळुन आला. आरोपींचे ताब्यातुन दोन चाकु, लोखंडी पाना व दुचाकी क्र. एम.एच ३१ एम. एफ ९६२५ मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

आरोपी हे कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्यांनी मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे मानकापुर येथे आरोपीविरूध्द कलम २२१, २२४, ३(५) भा.न्या. सं., सहकलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, दोन आरोपींना अटक केली आहे. पाहीजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे नविन कामठी :—** फिर्यादी श्रीमती शबनम बेगम मोहम्मद मुख्तार, वय ४० वर्षे, रा. रूईगंज, दरोगा मस्जीद जवळ, जुनी कामठी, नागपूर यांनी पोलीस ठाण नविन कामठी येथे तक्रार दिली की, त्यांची मुलगी नामे अनमता मोहम्मद मुख्तार, वय १९ वर्षे ही दिनांक १६.०९.२०२६ चे ११.०० वा. पासुन पोलीस ठाणे नविन कामठी हद्दीतील ईस्माईलपुरा येथून बेपत्ता झाली आहे. तीचा शोध घेतला असता, मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने तीला फुस लावून पळवून नेले असावे. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—लांबट, बांधा—मध्यम, उंची—५ फुट १ इंच, केस—काळे लांब, डोळे— काळे गिजरे, अंगात— काळ्या रंगाचा बुरखा घातलेला आहे. भाषा— हिंदी बोलते. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे नविन कामठी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**२) पोलीस ठाणे जरीपटका :—** फिर्यादी अश्वीन महेश कुसराम, वय ५६ वर्षे, रा. लिमजी खदान, चिंचभवन, कळमेश्वर, जि. नागपूर, ह.मु.— गजानन नगर, राजेंद्र ट्रेडर्स मागे, नारा रोड, जरीपटका, नागपुर यांनी पोलीस ठाणे जरीपटका येथे तक्रार दिली की, त्यांची मुलगी नामे रक्षा अश्वीन कुसराम, वय १९ वर्षे ही दिनांक २१.०९. २०२६ चे १४.०० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरुन बेपत्ता झाली आहे. तिचा शोध घेतला असता, मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने तीला फुस लावून पळवून नेले असावे. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची—४ फुट ६ इंच, केस—काळे लांब, अंगात—पांढऱ्या रंगाची सोनेरी फुले असलेली साडी व ब्लाऊज घातलेला आहे. भाषा— गोंड/हिंदी/मराठी बोलते. ओळख— उजव्या हातावर इंग्रजीत आर.के. अक्षरे लिहीलेले आहेत. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे जरीपटका येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**३) पोलीस ठाणे जरीपटका :—** फिर्यादी विक्रमसिंह, वय ३२ वर्षे, रा. जोराशी, हनुमान मंदीर जवळ, आत्री चौक, ग्वालीयर (मध्यप्रदेश), ह.मु.— ग्रामीण पोलीस मुख्यालयाचे मोकळ्या जागेत, ठवरे कॉलोनी जवळ, जरीपटका, नागपुर यांनी पोलीस ठाणे जरीपटका येथे तक्रार दिली की, त्यांचा मुलगा नामे बच्चा विक्रमसिंग वय १० वर्षे हा दिनांक १०.०९.२०२६ चे ०९.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील पाटनकर चौक येथे चहा आणण्यास गेला होता. तेथुन तो बेपत्ता झाला आहे. त्याचा शोध घेतला असता, मिळून आला

नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्याला फुस लावून पळवून नेले असावे. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—सडपातळ, उंची—३ फुट ८ इंच, केस—काळे, अंगात—काळ्या रंगाची शर्ट व पॅन्ट घातलेला आहे. भाषा—हिंदी बोलते. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे जरीपटका येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १३७(२) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



अनमता रक्षा बच्चा

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी/साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्र. ०४, नागपुर. | ३०५००४१ /२००१ | कलम ३७९ भा.दं.वि. | नितीन हेमराज पराते, रा. जगन मेंगरे चे घराजवळ, रामोची पोलीस चौक जवळ, तहसिल, नागपुर. | ०३.१०.२०२६ |
| २ | मा. २७ वे सह दिवाणी न्यायाधिश व. स्तर तथा प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी साहेब, नागपुर. | ७०२२/२० २३ | कलम १३८, एन.आय. ॲक्ट | अनंत मनोहर लोंढे, संचालक अथर्व क्रिएटर्स प्रा. लिमी., ९८ निलकमल हाऊसिंग सोसायटी, मंत्रा सेलीब्रेशन मागे, बॅक ऑफ इंडीया जवळ, मनिष नगर रोड, बेसा, नागपुर. | १९.०९.२०२६ |

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**

**सहा.पोलीस निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**